**नियमित दिवाणी दावा क्र.१८/२०२३ मध्ये नि.क्र.३३ वर आदेश.**

प्रफुल्ल सुंदर गोगरकर – ५.

वि.

दत्ता शिवाजी पवार – ३.

**(सीएनआर क्र.MHRG-13000-325-2023.)**

०१. प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश २६ नियम ९ अन्वये न्यायालयीन आयुक्त नेमणुकीकरता दाखल केला आहे.

०२. सदर अर्जातील थोडक्यात कथन असे आहे की, वादी यांची मौजे भोस्ते, ता. श्रीवर्धन, जि. रायगड येथील गट क्र.४३२ चे क्षेत्र ०–७९–० ही जमीन मिळकत आहे. सदरहु मिळकत ही या दाव्याचा विषय असून त्यास यापुढे 'दावा मिळकत' असे संबोधले जाईल. वादी यांनी प्रतिवादी विरुध्द कायम स्वरुपी मनाई आदेशा करीता व जाहीरनाम्या करीता सदरचा दावा दाखल केलेला आहे.

दावा मिळकतीच्या चतुःसिमा खालील प्रमाणे,

| | | |
|---|---|---|
| पुर्व | – | गट क्र.४३१. |
| पश्चिम | – | गट क्र.४३४. |
| दक्षिण | – | नदी पात्र. |
| उत्तर | – | गट क्र.४३८. |

०३. दावा मिळकत ही मुळची वादी क्र.१ ते ५ व प्रतिवादी क्र.४

यांचे वडील व वादी क्र.६ यांचे पती कै. सुंदर भिकाजी गोगरकर यांच्या मालकीची व खुद्द ताबे कब्जा वहिवाटीची होती. सुंदर भिकाजी गोगरकर यांचे निधन झालेले असुन वादी क्र.१ ते ६ व प्रतिवादी क्र.४ हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत. सदयस्थितीत सदर दावा मिळकतीच्या सात बारा सदरी वादी व प्रतिवादी क्र.४ यांचे नाव दाखल करण्याची प्रक्रिया महसुल दप्तरी चालु आहे. वादी व प्रतिवादी क्र.४ यांच्या व्यतिरिक्त दावा मिळकतीस अन्य कोणतेही वाली वारस नाहीत. प्रतिवादी क्र.४ हे दावा दाखल करते वेळी सही करण्यास उपलब्ध नसल्याने त्यांना प्रतिवादीपणात सामील करण्यात आलेले आहे.

०४. अशा प्रकारे दावा मिळकत ही सदयस्थितीत वादी व प्रतिवादी क्र.४ यांच्या ताबे कब्जा वहिवाटीत असून सदर दावा मिळकतीत फळझाडांचे उत्पन्न घेवुन आपआपल्या कुटुंबाचा उदर निर्वाह करत आहेत. वादी यांचे वडील कै. सुंदर भिकाजी गोगरकर यांनी दावा मिळकतीतील फळ झाडांना पाणी देण्याकरीता अंदाजे ३५ ते ४० वर्षापुर्वी एक विहीर बांधली होती. कायदया विषयीच्या अज्ञानामुळे अनावधानाने कै. सुंदर भिकाजी गोगरकर यांनी दावा मिळकतीच्या सात बारा पीक पाणी सदरी विहीरीची नोंद केली नाही. असे असले तरी विहीरीचा उपयोग कै. सुंदर भिकाजी गोगरकर व त्यांच्या मृत्यू नंतर त्यांचे वारस म्हणुन प्रतिवादी दावा मिळकतीतील फळ झाडांना पाणी पुरवठा करण्यासाठी करत होते.

०५. अशी परिस्थिती असताना दावा मिळकत व त्यातील विहीर ही केवळ आणि केवळ वादी व प्रतिवादी क्र.४ यांच्या मालकीची व हक्क वहिवाटीची असताना वादी क्र.१ ते ६ व प्रतिवादी क्र.४ यांना कोणत्याही

प्रकारे विचारात न घेता प्रतिवादी यांनी सदर मिळकतीतील विहीर ही अनाधिकाराने व बेकायदेशीर तोडुन त्या ठिकाणी शासनाच्या जलजीवन मिशन योजने अंतर्गत विहीरीचा परीघ वाढवुन त्या ठिकाणी दुसरी विहीर निर्माण केली.

०६. प्रतिवादी क्र.१ हे ठेकेदार असुन त्यांना ग्राम पंचायतीने सदर विहीर बांधणे व नळपाणी योजना अवलंबणे या करीता ठेका दिलेला आहे. प्रतिवादी क्र.२ हे ग्रुप ग्राम पंचायत भोस्ते या ग्राम पंचायतीचे सदयस्थितीत उप सरपंच असुन प्रतिवादी क्र.३ हे ग्रामीण पाणी पुरवठा समिती भट्टीचा माळ याचे प्रभारी अध्यक्ष आहेत. प्रतिवादी क्र.३ हे जलजीवन मिशन यांचे अधिकारी आहेत. सदरची योजना ही त्यांच्या कार्यालया मार्फत प्राप्त झाल्या कारणाने त्यांना दाव्यामध्ये प्रतिवादीपणात सामील करण्यात आलेले आहे.

०७. प्रतिवादी यांनी वादी यांच्या क्षेत्रामध्ये केलेल्या अतिक्रमणाची वस्तुस्थिती मे. न्यायालयाच्या समोर येणे न्यायोचित आहे. त्याकरीता वादी यांनी न्यायालयीन आयुक्त यांची नेमणुक करुन प्रतिवादींनी अतिक्रमण केलेल्या क्षेत्राची पाहणी करुन अतिक्रमीत क्षेत्राचा अहवाल मा. न्यायालयात सादर करावा असा आदेश होण्याची विनंती वादी यांनी केली आहे. न्यायालयीन आयुक्त यांची नेमणुक झाल्यास प्रतिवादीचे कोणतेही नुकसान होणार नाही.

०८. मे. न्यायालयाने उप अधिक्षक भूमी अभिलेख श्रीवर्धन यांची नेमणुक करुन मौजे भोस्ते, ता. श्रीवर्धन, जि. रायगड येथील गट क्र.४३२ ची मोजणी करुन प्रतिवादी यांनी दावा मिळकतीत केलेले अतिक्रमण

मोजणी नकाशा दाखवुन तसा नकाशा मे. न्यायालयात दाखल करावा अशी विनंती वादी यांनी केली आहे.

०९. प्रतिवादी क्र.१ ते ३ तर्फे वकीलांनी सदर अर्जावर दावा मिळकतीची कायदेशीर मोजणी लवकरात लवकर करण्यास त्यांची हरकत नाही असे म्हणणे दाखल केले आहे.

१०. अर्जाचे अवलोकन केले. वादी व प्रतिवादी यांच्या वकिलांनी त्यांच्या कथनांप्रमाणे युक्तीवाद केला आहे.

११. सदरचा दावा वादी यांनी कायम स्वरुपी मनाई मिळण्या करीता व घोषणा करुन मिळण्याकरीता दाखल केल्याचे दिसून येते. वादींच्या कथनांप्रमाणे प्रतिवादी यांनी दावा मिळकतीतील विहीर ही अनाधिकाराने व बेकायदेशीर तोडुन त्या ठिकाणी शासनाच्या जलजीवन मिशन योजने अंतर्गत विहीरीचा परीघ वाढवुन त्या ठिकाणी दुसरी विहीर निर्माण केली आहे किंवा कसे याची पाहणी करुन मिळण्याची विनंती वादी यांनी केल्याचे दिसून येते. दावा मिळकती मधील सदयस्थितीतील वस्तुस्थिती पटलावर येणे आवश्यक आहे.

१२. दावा मिळकतीमध्ये प्रतिवादी यांनी अतिक्रमण करुन विहीरीचे बांधकाम केले आहे किंवा कसे ही बाब योग्य त्या व्यक्ती मार्फत पटलावर येणे आवश्यक आहे. ही बाब पटलावर आल्याने कोणत्याही बाजुचे नुकसान होणार नाही. याउलट दाव्याच्या योग्य निर्णयाप्रत पोहोचण्यासाठी मदत होणार आहे. तसेच आयुक्ताची साक्ष व उलटतपास घेण्याचा अधिकार दोन्ही पक्षांना आहेच. दोन्ही पक्षांनी त्यांचे लेखी व तोंडी पुरावे योग्य त्या

वेळेस सादर करुन आयुक्तांच्या अहवालाबाबत म्हणणे / आक्षेप नोंदवून पुढील कारवाई करु शकतात. त्यामुळे सदरचा अर्ज वादीच्या मागणी प्रमाणे मंजूर होण्यास कोणताही अडथळा दिसून येत नाही. तसेच सदरचा दावा गट क्र.४३२ मध्ये केलेले अतिक्रमण दुर करुन मिळण्यासाठी असल्यामुळे आयुक्त नेमणुकीची बाब महत्वाची ठरते. आयुक्तांच्या अहवाला खेरीज दावा पुर्णपणे गुणदोषावर निर्णयीत झाला असे म्हणता येणार नाही. आयुक्त नेमणुकीची बाब दाव्याच्या अंतिम निकालापर्यंत पोहचण्यासाठी महत्वाची दिसून येते.

१३. सदर प्रकरणातील मिळकत ही मौजे भोस्ते, ता. श्रीवर्धन येथील असल्याने सदर कामी न्यायालयीन आयुक्त म्हणून उप अधिक्षक भूमी अभिलेख श्रीवर्धन यांची नेमणुक करणे न्यायोचित होईल. वरील सर्व कारणास्तव मी या कामी न्यायालयीन आयुक्त यांची नेमणुक करीत आहे. त्यामुळे या प्रकरणी उप अधिक्षक भूमी अभिलेख यांचे मार्फत सदरची मोजणी होणे गरजेचे आहे. सबब, खालील प्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

:: **आदेश** ::

०१. नि.क्र.३३ कडील अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

०२. उप अधिक्षक भूमी अभिलेख श्रीवर्धन यांची न्यायालयीन आयुक्त म्हणून नेमणूक करण्यात येत आहे.

०३. न्यायालयीन आयुक्त यांनी मौजे भोस्ते, ता. श्रीवर्धन, जि.

रायगड येथील वादी यांची गट नं.४३२ याची मोजणी करुन प्रतिवादी यांनी दावा मिळकतीत केलेले अतिक्रमण मोजणी नकाशा दाखवुन तसा नकाशा तयार करुन अहवाल या न्यायालयात सादर करावे.

०४. वादी यांनी न्यायालयीन आयुक्ताचे मोजणी शुल्क हे परस्पर अदा करावे व कागदपत्रांची पुर्तता करावी.

०५. येणे प्रमाणे प्राधिलेख काढण्यात यावे.

०६. न्यायालयीन आयुक्त यांनी दिनांक २६/०२/२०२४ रोजी किंवा त्यापुर्वी अहवाल सादर करावा.

०७. येणे प्रमाणे अर्ज निकाली करण्यात येत आहे.

श्रीवर्धन. ( सो. दि. जवळगेकर )
दिनांक – ०२/०२/२०२४. दिवाणी न्यायाधीश क.स्तर, श्रीवर्धन.